**वृत्तपत्र सुचना_** ( Date 18th February, 2009 (Wednesday)

## डी.एन. नगर वाहतुक विभागात मुंबई मेट्रो वन लिमीटेड कंपनीचे कामकाज व वाहतूकीवर निर्बंध

डी.एन. नगर वाहतुक विभागात मुंबई मेट्रो वन लिमीटेड कंपनीचे कामकाज सुरू झाले असुन दिनांक २०/०२/०९ पासुन मोठया प्रमाणात पश्चिम वाहीनीवरील वाहतुक एस.व्ही. रोड, भर्डावाडी ते जे.पी.रोड व पुर्व वाहीनी वरील वाहतुक जे.पी.रोड, सिझर रोड ते आंबोली जंक्शन, एस.व्ही रोड येथे वळवावी लागणार असुन वाहतूक व रहदारी सुरळीत चालू राहावी व जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून दिनांक २०/०२/०९ रोजी पासुन खालील नमूद प्रमाणे वाहतूकीवर निर्बंध घालण्यात येत आहेत.

### एक दिशा मार्ग

१) भर्डावाडी मार्ग हा एस.व्ही.रोड ते जे.पी. रोड जंक्शन पर्यत एक दिशा मार्ग करण्यात आला आहे. म्हणजेच जे.पी. रोड, भर्डावाडी जंक्शन पासुन ते एस.व्ही.रोड जंक्शन पर्यत पश्चिमेकडुन पुर्वेकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात आलेला आहे

२) जे.पी. रोड, अंधेरी (पश्चिम) येथील एस.व्ही रोड ते नवरंग सिनेमापर्यत सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात आलेला आहे

### वाहने उभी करण्याबाबत मज्जाव

१) भर्डावाडी लेन, अंधेरी (प) येथील एस.व्ही.रोड जंक्शन ते जे.पी. रोड जंक्शन पर्यत सर्व प्रकारच्या वाहनांना दोन्ही बाजुस २४ तास वाहने उभी करण्यास मज्जाव करण्यात आलेला आहे.

२) सिझर रोड, अंधेरी (प) येथील एस.व्ही रोड जंक्शन (आंबोली जंक्शन) ते जे.पी. रोड जंक्शन पर्यत सर्व प्रकारच्या वाहनांना दोन्ही बाजुस २४ तास वाहने उभी करण्यास मज्जाव करण्यात आलेला आहे

सही /-

पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
वाहतूक पोलीस मुख्यालय, मुंबई

---

*-Please forward this message to your friends who may be interested in having traffic updates of Mumbai City. Issued in public interest by Traffic Police H.Q, 87, Sir Pochkhanwala Road,Worli Mumbai.*
*For details please log on www .traffic policemumbai.org.*